संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५९/२०२४
निशाणी क्र.१२

सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः-

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - गोरक्ष श्रीपत शेंडगे,
वय - ४५ वर्षे, व्यवसाय- शेती,
राहणार – लेकुरवाळी आखाडा, ता. नेवासा, जि. अ.नगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.पी.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

मी आरोपीस ओळखत नाही. घटना दोन ते तीन वर्षापुर्वी कुकाणा ते जेऊर जाणा-या रोडवर तिरमल वस्तीजवळ घडली होती. सदर दिवशी मी कुकाणावरून देडगावला मोटरसायकलने दहाव्याच्या कार्यक्रमासाठी निघालो होतो. मी जात असतांना समोरून पांढ-या रंगाची चार चाकी गाडी आली व तीने मला धडक दिली. सदर अपघातात मी खाली पडलो व माझ्या पायाला मार लागला. त्यानंतर मी बेशुध्द होतो. मी शुध्दीवर आलो, त्यावेळी नजन हॉस्पीटल येथे होतो. पुढील उपचार मी नगर येथील साईदीप हॉस्पीटल येथे घेतले. घटनेबाबत मी तक्रार दाखल केली होती. मी दाखल केलेली फिर्याद मला दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. मजकुराबाबत मला माहिती नाही. मला धडक देणा-या गाडीचा क्रमांक व गाडी चालकाचे नाव सांगता येणार नाही. आरोपी आजरोजी कोर्टात आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही.

साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्याने अभियोगपक्षातर्फे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याच्या परवानगी मागण्यात आली. भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.

२. मला धडक देणा-या गाडीचा क्र. एम.एच.१२ एल.पी.५८८२ असा होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सदर गाडी आरोपी चालवत होता किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्याद वाचुन त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ एस.एस.शिंदे यांचेमार्फत नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.02.14 15:29:58 +0530

(श्रीमती.ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

दिनांक-१४/०२/२०२६.